झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड,
पुणे - १६
जा. क्र. झोपुप्रा Bev/ २०११
दिनांक - 21 FEB 2011

## ''झोपडपट्टी निर्मुलन आदेश''

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियन १९७१ चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरीता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो. - २००४ / प्र. क्र. - २१३ / झो. प. सु. - १ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतूदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजूरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) (१) मधील तरतुदीनुसार खालील अनुसुचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र हे या कार्यालयाकडील आदेशान्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित केलेले आहे. सदरचा आदेश हा महाराष्ट्र शासनाच्या दि.३०/९/२०१० रोजीच्या राजपत्रात आणि दि ५/१०/२०१० दोन स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसक प्रोप्रायटर नमन डेव्हलपर्स यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी तथा उप आयुक्त विभाग क्र.१, पुणे महानगरपालिका यांनी झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. सदरच्या जमिनीवर एकूण १५२ झोपड्या असून त्यापैकी १२१ निवासी व ६ बिगर निवासी झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरलेले आहेत. पात्र झोपडीधारकांपैकी ७० % पेक्षा जास्त झोपडीधारकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसकास संमती दिलेली आहे.

Scanned with CamScanner

आणि ज्याअर्थी विकसकाने झोपुप्रा नियमावलीनुसार घोषित झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवणेसाठी प्रस्ताव दाखल केलेला असून पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करणे प्रस्तावित आहे. सदर ठिकाणी " झोपडपट्टी पुनर्वसन योजना " राबविणे आवश्यक असल्याची माझी खात्री झालेली आहे. त्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती / घरे / झोपडया संक्रमण शिबीर व्यवस्था झाल्यानंतर टप्प्या टप्प्याने हया नियोजित कार्यक्रमानुसार पाडून टाकून जमिन खुली करणे आवश्यक आहे.

प्रथम फा.प्लॉ.क्र.५७६/ १०, सि.स.नं. १२१६/१० येथील मिळकत क्षेत्रातील घरे / झोपड्या पाडून पुनर्वसन इमारत बांधकाम करणे प्रस्तावित आहे.

त्याअर्थी मी, महेश झगडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ ड सह १२ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र हे "झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्र" म्हणून घोषित करीत आहे. सदर फा. प्लॉ.क्र. ५७६/१०, सि.स.नं. १२१६/१० झोपडया / बांधकामे हा आदेश प्रसिध्द झाल्यापासून ६ आठवडयाच्या आत पाडून टाकून जमीन खुली केली पाहिजे. त्यानंतर संक्रमण शिबीर व्यवस्था झाल्यानंतर इतर बांधकामे पाडून टाकण्यात येतील.

सदरचा आदेश हा खालील अटींवर देण्यात येत आहे.

१. सदर आदेशापासून तीन महिन्याच्या मुदतीच्या आत विकसकाने योजनेचे नकाशे मंजूर करून प्रत्यक्ष बांधकाम सुरू केले पाहिजे.

२. विकसकाने योजनेचे काम चालू करण्यापूर्वी विस्थापित होणाऱ्या पात्र लाभार्थींची राहण्याची तात्पुरती पर्यायी व्यवस्था आवश्यक सर्व सुविधांसह स्वखर्चाने केली पाहिजे.

३. विकसकाने पुनर्वसन घटकाच्या इमारतीचे बांधकाम ~~तीन~~ दोन वर्षात पूर्ण केले पाहिजे.

४. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर एक महिन्यात विकसकाने सदनिकांचा / गाळयांचा ताबा लाभार्थींना दिला पाहिजे.

५. वाजवी व सबळ कारणामुळे इमारतीच्या बांधकामास विलंब झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांच्या निदेशानुसार विलंब कालावधीसाठी दंड आकारून मुदतवाढ देण्यात येईल.

६. विकसकाने योजनेच्या बांधकामाची गुणवत्ता राखण्यात कसूर केल्यास अगर बांधकामाची प्रगती समाधानकारक नसल्यास विकसकावर उक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वये कारवाई करण्यात येईल.

७. पात्र लाभार्थ्यांना पुनर्वसन योजनेतील सदनिकांचा / गाळयांचा ताबा दिल्यानंतर एक महिन्यात विकसकाने या क्षेत्रातील इतर सर्व झोपडया / बांधकामे पाडून टाकून जागा रिकामी केली पाहिजे

Scanned with CamScanner

८. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियमावलीनुसार योजनेतंर्गत आवश्यक ती सर्व कामे विकसकाने करणे बंधनकारक राहील.

सदरच्या आदेशामुळे बाधीत होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस आदेश प्रसिध्द झाल्यापासून ४ (चार) आठवडयांच्या आत उक्त अधिनियमाच्या कलम ३ ड सह १२ (४) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

**भांबुर्डा, शिवाजीनगर, टी.पी.स्कीम १ पुणे**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| सि.स.नं.१२१६/४,<br>फा.प्लॉ.क्र.५७६/४ | ८०२.८१७ चौ.मी<br>(९९५.५२ चौ.मी.पै. फर्ग्युसन रोड कडील रस्तारूंदी क्षेत्र वजा जाता उर्वरित क्षेत्र) | पुर्व - फा.प्लॉ.नं.५७६/९<br>दक्षिण - फा.प्लॉ.नं.५७६/५<br>पश्चिम - लागु फर्ग्युसन रस्ता<br>उत्तर - लागु रस्ता |
| सि.स.नं.१२१६/५<br>फा.प्लॉ.क्र.५७६/५ | ९८२.८२ चौ.मी<br>(११३९.११ चौ.मी.पै. फर्ग्युसन रोड कडील रस्तारूंदी क्षेत्र वजा जाता उर्वरित क्षेत्र) | पुर्व - फा.प्लॉ.नं.५७६/८ व ९पै.<br>दक्षिण - फा.प्लॉ.नं.५७६/६व ७पै.<br>पश्चिम - फर्ग्युसन रस्ता<br>उत्तर - रस्ता व फा.प्लॉ.नं.५७६/४ |
| सि.स.नं.१२१६/९<br>फा.प्लॉ.क्र.५७६/९ | ९३८.८७ चौ.मी | पुर्व - लागु रस्ता<br>दक्षिण - लागु फा.प्लॉ.नं.५७६/८<br>पश्चिम - फा.प्लॉ.नं.५७६/४ व ५<br>उत्तर - लागु रस्ता |
| सि.स.नं.१२१६/१०<br>फा.प्लॉ.क्र.५७६/१० | १११३ चौ.मी. | पुर्व - फा.प्लॉ.नं.५७५ पै.<br>दक्षिण - फा.प्लॉ.नं.५७६/११<br>पश्चिम - लागु रस्ता<br>उत्तर - फा.प्लॉ.नं.५७६/३ |

**एकूण झोपडपट्टी पुनर्वसन योजना क्षेत्र** (निर्मूलन क्षेत्र) **३८३८.५०७ चौ.मी.**

सदर योजनेसंबंधीची सर्व कागदपत्रे संबंधीतांना पाहण्यासाठी या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध ठेवली आहेत.

सदरचा आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

**"सत्यप्रत"**

**सहाय्यक अभियंता क्र.**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र**
**पुणे-१६.**

d/shindel\3c-118-Rip210-13

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड
स्थापना
३०/१२/२००५
★ पुणे ★

(महेश झगडे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे .

Scanned with CamScanner